निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
बुधवार
१८ फेब्रुवारी २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १५ वे अंक: ३५३ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

# मुंबई ठरणार जागतिक भांडवलासाठीचे प्रवेशद्वार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## भविष्यातील जागतिक व्यवस्था कॉरिडॉर-आधारित, महाराष्ट्राची भूमिका निणार्यक




**मुंबई** /जागतिकीकरणाच्या नव्या टप्प्यात 'विश्वासार्ह जागतिकीकरण' ही संकल्पना पुढे येत असून महाराष्ट्राचे धोरणात्मक महत्त्व अधोरेखित होते. महाराष्ट्र भारताच्या जीडीपीमध्ये १४ ते १५ टक्के योगदान देतो. परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र आघाडीवर आहे. देशाच्या औद्योगिक उत्पादनात २० टक्के वाटा आणि पश्चिमेकडील बंदरांमधून ६० टक्क्यांहून अधिक कंटेनर वाहतूक महाराष्ट्रातून होते. मुंबई येत्या काळात जागतिक भांडवलाचे प्रवेशद्वार ठरणार आहे. मुंबई आणि महाराष्ट्र जागतिक आर्थिक स्थैर्य घडविण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल. बहुध्रुवीय जगात विश्वासार्ह भागीदारीच यशस्वी ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

विदेश मंत्रालय, फ्युचर इकॉनॉमिक कोऑपरेशन कौन्सिल आणि महाराष्ट्र शासनाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय ग्लोबल इकॉनॉमिक को-ऑपरेशन परिषदेचे उद्धघाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांच्या प्रमुख उपस्थित करण्यात आले. यावेळी एफइसीआयसीचे कार्यकारी संचालक विजय चौथाईवाले, एफइसीआयसीच्या सल्लागार मंडळाचे सदस्य बाबा कल्याणी, आदिल झैनुलभाई, सायरिल श्रॉफ, प्रतिनिधी, उद्योग क्षेत्रातील नेते, राजनैतिक समुदायाचे सदस्य आणि जागतिक भागीदार मोठया संख्येने उपस्थित होते.

परिषदेला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा शुभेच्छा संदेश

**जगासाठी भारत आशेचा किरण**

परराष्ट्र व्यवहार मंत्रालय आणि महाराष्ट्र शासन यांच्या सहकार्याने फ्युचर इकॉनॉमिक को-ऑपरेशन कौन्सिल (एफईसीसी) यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या उद्धाटनात्मक ग्लोबल इकॉनॉमिक को-ऑपरेशन (जीईसी) परिषद जागतिक पातळीवर झपाट्याने घडणाऱ्या बदलांच्या पार्श्वभूमीवर सखोल आंतरराष्ट्रीय आर्थिक संवादाला चालना देण्यासाठी एक महत्वपूर्ण पाऊल आहे. व्यापक आंतरराष्ट्रीय सहकार्यासाठी ही परिषद उच्चस्तरीय व्यासपीठ म्हणून कार्य करते. ही परिषद धोरणात्मक नवोन्मेष आणि आर्थिक संधी यांच्या संगमावर विविध क्षेत्रांतील मंत्री, वरिष्ठ धोरणनिर्माते, अग्रगण्य अर्थतज्ज्ञ, जागतिक उद्योगनेते, गुंतवणूकदार आणि धोरणात्मक प्रतिनिधींना एकत्र आणते.

अनिश्चिततेच्या काळात स्थिर नेतृत्वाच्या शोधात असलेल्या जगासाठी भारत आशेचा किरण ठरला आहे. उच्च आर्थिक वाढ आणि कमी महागाई यांचा दुर्मिळ समतोल राखत, भारत जागतिक आव्हानांसाठी व्यावहारिक आणि विस्तारक्षम उपाय प्रदान करत आहे. एक मोठे आव्हान म्हणजे कोणालाही मागे न ठेवता जास्तीत जास्त लोकांपर्यंत कल्याणकारी योजना पोहोचवणे आणि ते कार्यक्षमतेने साध्य करणे. भारताने जागतिक दर्जाच्या डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या माध्यमातून उद्दिष्ट हे वास्तवात उतरवले आहे. पारदर्शकता आणि जबाबदारीसह 'एकाच क्लिक'वर नागरिकांपर्यंत कल्याणकारी लाभ पोहोचवले जात आहेत.

आज भारत हा जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या प्रमुख अर्थव्यवस्थांपैकी एक आहे आणि शाश्वतता ही त्याच्या प्रगतीच्या केंद्रस्थानी आहे. देशाच्या एकूण स्थापित ऊर्जा क्षमतेपैकी ५० टक्क्यांहून अधिक हिस्सा अपारंपरिक (नॉन-फॉसिल) ऊर्जा स्रोतांमधून येतो, ज्यामुळे हा टप्पा गाठणाऱ्या प्रमुख देशांमध्ये भारत अग्रस्थानी आहे.

भारत आता ग्लोबल साऊथचा आत्मविश्वासपूर्ण आणि विश्वासार्ह आवाज म्हणून उदयास आला आहे. विविध सहभाग आणि दूरदृष्टीपूर्ण अजेंड्याच्या माध्यमातून अधिक संतुलित आणि सर्वसमावेशक जागतिक व्यवस्थेला आकार देण्यात भारत महत्त्वाची भूमिका बजावत आहे. ग्लोबल इकॉनॉमिक को-ऑपरेशन परिषद अर्थव्यवस्थांमधील एक महत्त्वाचा दुवा ठरू शकते . कल्पना, भांडवल आणि नवोन्मेष यांना जोडत अधिक सहकार्यपूर्ण आणि परस्परसंलग्न जागतिक आर्थिक भविष्यासाठी भक्कम पाया घालू शकते. या परिषदेत यशस्वी आणि परिणामकारक चर्चेसाठी प्रधानमंत्री यांनी शुभेच्छा दिल्या.

**पारदर्शकता, नियमन आणि व्यापकता यात मुंबई आघाडीवर**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आर्थिक सार्वभौमत्व म्हणजे आत्मनिर्भरता नव्हे; तर विविधीकृत व्यापार, उत्पादन क्षमता, ऊर्जा सुरक्षा आणि तंत्रज्ञान क्षमता यांचे संतुलित संयोजन होय. धोरणात्मक स्वायत्तता आणि सहकार्यपूर्ण सहभाग. हाच दृष्टिकोन महाराष्ट्र स्वीकारतो. भविष्यातील जागतिक व्यवस्था कॉरिडॉर-आधारित असेल; भविष्यात महाराष्ट्र महत्वाची भूमिका पार पाडेल. आर्थिक लवचिकता प्रभावी ठरेल. पारदर्शकता, नियमन आणि व्यापकता यात मुंबई आघाडीवर राहील.

मुंबई समुद्री व्यापार, उद्योजकता आणि जागतिक सहभाग यांची परंपरा असलेले शहर आहे. येथून एक स्थिर, सर्वसमावेशक आणि रणनीतिकदृष्ट्या सक्षम आर्थिक व्यवस्था घडवू. बहुध्रुवीय जग हा धोका नाही; योग्य रचनेत ती एक संधी आहे. आणि त्या संधीची रचना करण्यासाठी महाराष्ट्र सज्ज आहे,असा विश्वास यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा गव्हर्नन्स, सेमिकंडक्टर साखळी आणि कौशल्यपूर्ण मानवसंपत्ती यांचे संयोजन भविष्यातील शक्ती ठरवेल. महाराष्ट्र एआय पार्क, डेटा सेंटर क्लस्टर आणि कौशल्य विद्यापीठे उभारत आहे. तसेच हवामान बदल ही आता केवळ पर्यावरणीय नव्हे तर भूराजकीय बाब बनली आहे. ग्रीन हायड्रोजन, सौर आणि पवन ऊर्जा, हरित गतिशीलता आणि शाश्वत शहरी पायाभूत सुविधा यामध्ये महाराष्ट्र मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सद्यस्थितीत जागतिक व्यवस्था नव्याने आकार घेत आहे. जागतिक व्यापाराची वाढ मोठ्या उलथापालथीतून जात आहे. पुरवठा साखळ्या नव्याने रचल्या जात आहेत. सेमिकंडक्टर, ऊर्जा, अन्नसुरक्षा, दुर्मिळ खनिजे आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारखे धोरणात्मक क्षेत्र आता राष्ट्रीय सुरक्षेच्या धोरणांमध्ये अंतर्भूत झाले आहेत.

भांडवली प्रवाह केवळ परताव्यावर नाही, तर भूराजकीय सरेखनावर आधारित होत आहेत. हे आर्थिक राज्यकारभाराचे युग आहे. या युगात भारताची प्रगती ही संरचनात्मक आहे. जागतिक आर्थिक पुनर्रचनेच्या या निर्णायक टप्प्यावर, भारताची स्पष्टता आणि आत्मविश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामुळे अधिक दृढ झाला आहे. जी-२० अध्यक्षपद, 'इंडिया-मिडल ईस्ट-युरोप इकॉनॉमिक कॉरिडॉर' (आयएमईसी) ची संकल्पना, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांचा प्रसार आणि 'ग्लोबल साऊथ'चा आवाज म्हणून भारताची भूमिका - या सर्व उपक्रमांमुळे भारत नव्या आर्थिक व्यवस्थेच्या निर्मितीत सहभाग घेत आहे. कुटनीती आणि अर्थकारण हे आता अविभाज्य झाले आहेत. परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर त्यांच्या नेतृत्वाखाली भारताने धोरणात्मक स्वायत्तता जपत जागतिक स्तरावर विश्वासार्ह भागीदारी अधिक दृढ केली आहे. भारताने अलीकडील काळात उच्च दर्जाचे मुक्त व्यापार करार (एफटीए) यशस्वी आहे. हे करार केवळ व्यापारापुरते मर्यादित नसून पुरवठा साखळी, भांडवली प्रवाह, तंत्रज्ञान देवाणघेवाण आणि कौशल्यांची देवाणघेवाण यांची व्यापक धोरणात्मक चौकट आहे.

**भारत जगातली सर्वात वेगाने वाढणारी मोठी अर्थव्यवस्था**

आज भारत जगातील सर्वात वेगाने वाढणारी चौथ्या क्रमांकाची मोठी अर्थव्यवस्था असून तिसऱ्या क्रमांकाकडे वाटचाल करत आहे. जगातील सर्वात मोठी डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा भारतात आहे. कुशल मानवसंपत्ती आणि ग्लोबल साऊथचा प्रभावी आवाज म्हणून भारत उभा आहे. जागतिकीकरणाच्या नव्या टप्प्यात 'विश्वासार्ह जागतिकीकरण' ही संकल्पना पुढे येत आहे. आणि याच ठिकाणी महाराष्ट्राचे धोरणात्मक महत्त्व अधोरेखित होते.

**महाराष्ट्र जागतिक भांडवलाचे प्रवेशद्वार**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, भारताची आर्थिक राजधानी मुंबई आहे. रोडपासून सुएझ कालव्यापर्यंत, अटलांटिक व्यापारमार्गांपासून पॅसिफिक पुरवठा साखळीपर्यंत - संपर्क हेच शक्तीचे मूळ आहे. आज इंडो-पॅसिफिक सागरी चौकट आणि नव्याने रचल्या जाणाऱ्या पुरवठा साखळ्या उदयास येत आहेत.

जवाहरलाल नेहरू पोर्ट अथॉरिटी, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि प्रस्तावित वाढवण बंदरामुळे महाराष्ट्र पश्चिमेकडील सागरी पट्ट्यात केंद्रस्थानी आहे. मुंबई आयएमईसी चा पश्चिमेकडील आधारबिंदू बनण्यास सज्ज असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

इलेक्ट्रॉनिक्स, ईव्ही उत्पादन, ग्रीन हायड्रोजन, बॅटरी उत्पादन, सेमिकंडक्टर, औषधनिर्मिती, जैवतंत्रज्ञान आणि संरक्षण-एरोस्पेस क्षेत्रात महाराष्ट्र आघाडीवर आहे. आपण केवळ खर्चावर नव्हे, तर विश्वासार्हता, कायद्याचे राज्य आणि प्रमाणावर स्पर्धा करत आहोत. आर्थिक स्थैर्य ही आजच्या काळातील खरी ताकद आहे.

भांडवली बाजार विस्तारत आहेत. म्युनिसिपल बॉण्ड, ग्रीन बॉण्ड, इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट्स आणि सार्वभौम निधी भागीदारी वाढत आहेत. पायाभूत सुविधा, लॉजिस्टिक्स, नवीकरणीय ऊर्जा आणि डिजिटल अर्थव्यवस्था या दीर्घकालीन मालमत्ता आहेत. पश्चिम हिंद महासागर कॉरिडॉर हे या चर्चेचे एक महत्त्वाचे केंद्र आहे. आफ्रिका, गल्फ आणि आशियातील भागीदारी वाढवताना मुंबई ऐतिहासिक व्यापारी संबंधांना नव्या उंचीवर नेत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केले.

डी-रिस्किंग' आणि विविधीकरण मार्ग स्वीकारणे आवश्यक - परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर

परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी जागतिक परिस्थिती, भारताची भूमिका आणि 'विकसित भारत २०४७' या उद्दिष्टाबाबत सविस्तर मांडणी केली. ते म्हणाले की, जग सध्या अत्यंत अस्थिर आणि अनिश्चित टप्प्यातून जात आहे. धोरणात्मक, राजकीय, आर्थिक आणि तांत्रिक क्षेत्रांमध्ये एकाच वेळी मोठे बदल घडत असून जुन्या गृहितकांना आव्हान दिले जात आहे. अशा परिस्थितीत 'डी-रिस्किंग' आणि विविधीकरण हा मार्ग स्वीकारणे आवश्यक आहे. कोविड-१९ आणि युक्रेन तसेच पश्चिम आशियातील संघर्षांमुळे पुरवठा साखळीतील कमकुवतपणा अधोरेखित झाला आहे.

'विकसित भारत २०४७' हे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जाहीर केलेले राष्ट्रीय ध्येय असून उद्योग, सेवा, शेती, प्रगत तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा आणि नवोन्मेष या सर्व क्षेत्रांत समांतर प्रगती आवश्यक आहे. 'मेक इन इंडिया' उपक्रमाचा विस्तार संशोधन, डिझाइन आणि सहनिर्मितीपर्यंत करण्यात आला आहे. गेल्या दशकात महामार्ग, रेल्वे, विमानतळ, बंदरे, ऊर्जा आणि डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांमध्ये मोठी गुंतवणूक झाल्यामुळे 'ईज ऑफ डुइंग बिझनेस' आणि 'ईज ऑफ लिव्हिंग'मध्ये लक्षणीय सुधारणा झाली आहे.

**'डी-रिस्किंग'च्या जागतिक प्रक्रियेत भारत महत्त्वाचा भागीदार**

परराष्ट्र मंत्री जयशंकर म्हणाले की, भारताने अलीकडेच युरोपियन युनियन आणि अमेरिकेसोबत व्यापार करार केले असून यापूर्वी युनायटेड किंगडम, ईएफटीए, न्यूझीलंड, ओमान, यूएई, ऑस्ट्रेलिया आणि मॉरिशस देशांशी करार करण्यात आले. या करारांमुळे भारतीय उत्पादनांना जागतिक बाजारपेठेत अधिक प्रवेश मिळत असून 'डी-रिस्किंग'च्या जागतिक प्रक्रियेत भारत महत्त्वाचा भागीदार ठरत आहे.

तंत्रज्ञानाधारित आणि कौशल्याधारित अर्थव्यवस्थेकडे जग वाटचाल करत असताना भारतातील युवा लोकसंख्या आणि कौशल्यसंपन्न मनुष्यबळ हे मोठे बलस्थान आहे. ५जी तंत्रज्ञान, चांद्रयान मोहीम, वंदे भारत रेल्वे आणि यूपीआय यांसारख्या उपक्रमांमुळे 'न्यू इंडिया'ची ओळख निर्माण झाली आहे.

अस्थिर जागतिक वातावरणात भारत विश्वासार्ह आणि सक्षम भागीदार म्हणून पुढे येत असल्याचा विश्वास परराष्ट्र मंत्री जयशंकर यांनी व्यक्त केला.

# पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत मुंबई क्लायमेट वीकमध्ये पर्यावरण विभागाचे दोन महत्त्वाचे सामंजस्य करार, दोन मार्गदर्शक अहवाल प्रसिद्ध

**मुंबई/** हवामान बदलाचा मुकाबला आणि चक्रीय अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग व राज्य हवामान कृती कक्षाने मुंबई क्लायमेट वीक २०२६ दरम्यान दोन महत्त्वाच्या सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या केल्या. राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात राज्य हवामान कृती कक्षाने क्लायमेट ट्रेड एलएलपी सोबत आणि पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने हिंदुस्थान कोकाकोला बेव्हरेज कंपनीसोबत महा-आरईपीटी अभियान राबविण्यासंदर्भात करार केला. पीईटी बाटल्यांचे संकलन व पुनर्वापरासाठी पहिल्यांदाच देशात कोकाकोला कंपनीने राज्य शासनासोबत सामंजस्य करार केला आहे.

पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, वातावरणीय बदल कक्षाचे संचालक अभिजित घोरपडे यांनी या करारावर स्वाक्षरी केल्या.

वापरलेल्या पीईटी बाटल्यांचे संकलन आणि पुनर्वापर करण्यासाठी हिंदुस्थान कोकाकोला कंपनी (एचसीसीबी) आणि महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागामध्ये सामंजस्य करार करण्यात आला. हिंदुस्थान कोकाकोला बेव्हरेज कंपनीसोबत महा-आरपीईटी अभियान सुरू करण्यासाठी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने हा करार केला. या उपक्रमातून राज्यभर वापरलेल्या पीईटी बाटल्यांचे संकलन व पुनर्वापराला चालना दिली जाणार आहे. सार्वजनिक-खाजगी भागीदारीच्या माध्यमातून कचरा व्यवस्थापन अधिक शाश्वत करण्याचा हा प्रयत्न असून पर्यावरण संवर्धनासाठी राज्याचा दीर्घकालीन दृष्टिकोन यातून अधोरेखित होत असल्याचे पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने सांगितले आहे. या दोन्ही करारांमुळे हवामान प्रतिकारशक्ती वाढवणे, संस्थात्मक क्षमता मजबूत करणे आणि शाश्वत विकासाला चालना देणे शक्य होणार आहे.

मोठ्या एफएमसीजी कंपनीसोबत महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाने पहिल्यांदाच समुदाय-केंद्रित, संरचित पीईटी संकलन आणि जनजागृती कार्यक्रम राबवण्यासाठी भागीदारी केली आहे. या सहकार्याअंतर्गत मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पनवेल, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, बीड आणि पालघर येथे जनजागृती मोहिमा, संरचित संकलन व्यवस्था आणि जबाबदार विल्हेवाटीबाबत माहिती-शिक्षण साहित्य प्रसारित केले जाणार आहे. किरकोळ विक्री केंद्रे, हॉटेल्स, कार्यस्थळे आणि सार्वजनिक ठिकाणी संकलन सुविधा उभारून शाळा, संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्थांशी वर्षभर समन्वय ठेवला जाणार आहे.

या करारातून धोरणात्मक देखरेख आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यांचा समन्वय साधत सार्वजनिक-खासगी भागीदारीचे व्यावहारिक मॉडेल उभे राहणार आहे. प्रमुख शहरांमध्ये पीईटी कचरा व्यवस्थापन अधिक शिस्तबद्ध आणि समुदाय-केंद्रित पद्धतीने राबवण्याचा पाया या उपक्रमातून घातला जाणार असल्याचे सांगण्यात आले.

राज्य हवामान कृती कक्षाने क्लायमेट ट्रेड एलएलपी सोबत केलेल्या करारातून हवामान विषयक जनजागृती, भागधारकांचा सहभाग आणि क्षमता वृद्धी यांना बळ दिले जाणार आहे. या सहकार्यामुळे महाराष्ट्राच्या राज्य हवामान कृती आराखड्याची प्रभावी




अंमलबजावणी, संवाद व्यवस्था आणि विविध विभागांतील समन्वय मजबूत होणार आहे.

राज्य हवामान कृती कक्षाच्या दोन अहवालाचे पंकजा मुंडे यांच्या हस्ते प्रकाशन

मुंबई क्लायमेट वीकमध्ये राज्य हवामान कृती कक्षाने दोन महत्त्वाचे अहवालही प्रसिद्ध केले. सी ४० सिटीज यांच्या सहकार्याने तयार करण्यात आलेल्या सी४० अहवाल: महाराष्ट्रातील शहरांतील ऊर्जा आणि बांधकाम क्षेत्रातील नेट झिरो संक्रमण या अहवालात महाराष्ट्रातील शहरांसाठी नेट-झिरो आणि हवामान-प्रतिरोधक विकासाचा रोडमॅप मांडण्यात आला आहे. मुंबई, अमरावती आणि ठाणे यांसह सात शहरांनी उच्च प्रभावी कृती आराखडे तयार केले असून, त्यात महानगरपालिका इमारती नेट-झिरो करणे आणि छतावरील सौरऊर्जा वाढवण्यावर भर देण्यात आला आहे.

तसेच सेंटर फॉर वॉटर अँड सॅनिटेशन सीडब्लूएएस यांच्या सहकार्याने तयार केलेल्या सीडब्लूएएस अहवाल: हवामान-प्रतिक्रियाशील वॉश सेवा या मार्गदर्शिकेत हवामान बदलाशी सुसंगत पाणी व स्वच्छता सेवा कशा राबवायच्या याबाबत व्यावहारिक मार्गदर्शन देण्यात आले आहे. चक्रीय अर्थव्यवस्था पद्धती, ऊर्जा संक्रमण आणि सर्वसमावेशकतेवर भर देत महाराष्ट्रातील शहरांतील अनुभव यात मांडले आहेत.

या उपक्रमांमुळे शहरकेंद्रित हवामान कृतीत महाराष्ट्र आघाडीवर राहील आणि इतर शहरांसाठी अनुकरणीय नमुना निर्माण होईल.

# महाराष्ट्रातील लाखोंची फी असलेल्या खासगी शाळांमध्ये मोफत प्रवेश, कधीपर्यंत करायचा अर्ज? आरटीई

महाराष्ट्रातील खासगी शाळांमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि वंचित मुलांसाठी राखीव २५ टक्के जागांवर प्रवेश घेण्यासाठी ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. याअंतर्गत राज्यातील ८६५० स्वयंअर्थसहाय्यित व विनाअनुदानित खासगी शाळांमध्ये एकूण १ लाख १२ हजार ७०६ जागा या योजनेअंतर्गत उपलब्ध आहेत. मुलांना इयत्ता पहिली किंवा पूर्वप्राथमिक वर्गात प्रवेश मिळू शकतो. याबद्दल सविस्तर जाणून घेऊया.



**१० शाळांचा प्राधान्यक्रम**

आरटीई अंतर्गत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांना एका अर्जात जास्तीत जास्त १० शाळांचा प्राधान्यक्रम नोंदवता येईल. घरापासून १ किलोमीटर अंतरातील शाळांना प्रथम प्राधान्य द्यावे लागेल. अंतर तपासण्यासाठी गूगल मॅपचा वापर केला जाईल आणि पत्ता अचूक नमूद करणे आवश्यक आहे.

**कोण पात्र?**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त-भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागासवर्ग, एचआयव्ही बाधित किंवा प्रभावित मुलं, दिव्यांग मुले आणि अनाथ मुले या योजनेचा लाभ घेऊ शकतात. तसेच कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १ लाख रुपयांपेक्षा कमी असलेल्या आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकातील मुलेही पात्र आहेत. यापूर्वी आरटीईने प्रवेश घेतलेल्या मुलांना पुन्हा अर्ज करता येणार नाही. एकापेक्षा जास्त अर्ज केल्यास सर्व अर्ज रद्द मानले जातील, याची पालकांनी नोंद घ्या.

**अर्ज कसा करावा?**

पालकांनी https://student.maharashtra.gov.in/admšportal या अधिकृत वेबसाइटवर जाऊन ऑनलाइन अर्ज भरावा. नोंदणी पूर्ण झाल्यानंतर एकाच टप्प्यात ऑनलाइन सोडत (लॉटरी) काढली जाईल. त्यानंतर प्रवेशपात्र मुलांची यादी आणि प्रतीक्षा यादी जाहीर होईल. पालकांना प्रत्येक टप्प्यात एसएमएसने सूचना दिली जाईल. पहिल्या फेरीत जागा शिल्लक राहिल्यास प्रतीक्षा यादीतील मुलांना संधी दिली जाईल, अशी माहिती देण्यात आली आहे.

**कागदपत्रे**

अर्जासोबत पालकांचे आधारकार्ड, मुलाचा जन्मदाखला, राहण्याचा पुरावा, लागू असल्यास जात प्रमाणपत्र, २०२३-२४ किंवा २०२४-२५ चा उत्पन्नाचा दाखला, दिव्यांग प्रमाणपत्र आणि भाड्याच्या घरात राहत असल्यास नोंदणीकृत भाडे करार आवश्यक आहे. प्रवेश निश्चित झाल्यानंतर गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या समितीकडून कागदपत्रांची तपासणी केली जाणार आहे.

**कधीपर्यंत करता येईल नोंदणी?**

शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या सुधारित नियमांनुसार ही प्रक्रिया राबवली जात आहे. पालकांना १० मार्चपर्यंत अर्ज भरता येणार आहेत. खोटी माहिती दिल्यास प्रवेश कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल आणि कायदेशीर कारवाई केली जाईल. मुदत संपल्यानंतर कोणताही अर्ज स्वीकारला जाणार नाही.

# सत्ता, वासना आणि सैतानी साम्राज्य!

**सत्तांधांच्या चेहऱ्यावरील मुखवटे ओरबाडणारी 'एपस्टीन फाईल्स'**

जगाला माणुसकी आणि नीतिमत्तेचे डोस पाजणाऱ्या जागतिक महासत्तांच्या आणि बड्या प्रस्थांच्या घरांत किती काळोख दाटला आहे, याचा भीषण पुरावा म्हणजे 'जेफ्री एपस्टीन फाईल्स'. ही केवळ न्यायालयाची कागदपत्रे नाहीत, तर हे आधुनिक जगातील सर्वात मोठ्या सैतानी साम्राज्याचे 'मृत्युपत्र' आहे. कुख्यात उद्योजक जेफ्री एपस्टीन याने आपल्या खासगी बेटावर जे 'पाप' पेरले होते, त्याचे पीक आता जगासमोर येऊ लागले आहे आणि त्यातून समोर येणारी नावे ऐकून जगाचा थरकाप उडाला आहे.

**बेटावरचे नरक आणि 'लोलिता एक्सप्रेस'**

एपस्टीनचे 'लिटिल सेंट जेम्स' बेट म्हणजे निव्वळ एखादी चैनीची जागा नव्हती, तर तो माणुसकीला काळिमा फासणारा एक अड्डा होता. अल्पवयीन मुलींचे लैंगिक शोषण, मानवी तस्करी आणि सत्तेच्या जोरावर सुरू असलेला नंगा नाच तिथे वर्षांनुवर्षे सुरू होता. या सैतानी खेळाला साथ देण्यासाठी वापरले गेले ते 'लोलिता एक्सप्रेस' नावाचे विमान. या विमानाच्या 'फ्लाइट लॉग्स'मध्ये नोंद असलेली नावे वाचली की प्रश्न पडतो- आपण ज्यांना जगाचे नेते मानतो, ते इतके नीच कसे असू शकतात?

**नावे मोठी, पण कृत्ये छोटी!**

या फाईल्समध्ये कोणाचे नाव नाही? अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष, नामांकित शास्त्रज्ञ, राजपुत्र, हॉलिवूडचे अभिनेते ते जगप्रसिद्ध उद्योजक... सत्तेच्या आणि पैशाच्या शिखरावर बसलेली ही माणसे एका गुन्हेगाराच्या इतकी जवळ कशी होती? ज्यांच्या एका शब्दावर जगाची धोरणे ठरतात, ती माणसे एका अल्पवयीन मुलींच्या तस्करीचा व्यापार करणाऱ्या नराधमाच्या मेजवानीला का हजर होती? हा केवळ योगायोग नाही, तर हे एक संघटित गुन्हेगारी जाळे होते, ज्याला राजश्रय मिळाला होता.

**संशयास्पद मृत्यू आणि दडपशाही**

२०१९ मध्ये जेफ्री एपस्टीनचा तुरुंगात झालेला मृत्यू हा 'आत्महत्या' म्हणून घोषित केला असला, तरी त्यावर कोणाचाही विश्वास नाही. कारण एपस्टीन जिवंत असता, तर अनेक देशांतील सत्ता पालटली असती. तो जिवंत राहणे हे जगातील 'पॉवरफुल' लोकांसाठी धोक्याचे होते. त्यामुळे त्याचा गळा दाबला गेला की त्याला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले गेले, हा प्रश्न आजही अनुत्तरित आहे.

**न्याय की केवळ कागदपत्रे?**

या फाईल्स आता सार्वजनिक झाल्या असल्या तरी, प्रश्न हा आहे की खरोखरच या बड्या धेंडांना शिक्षा होणार का? की सत्तेचा वापर करून पुन्हा एकदा हे प्रकरण दाबले जाणार? पीडित मुलींच्या किंकाळ्या त्या बेटावर वर्षानुवर्षे घुमत होत्या, तेव्हा हे 'ब्रह्मज्ञानी' लोक तिथे मज्जा मारत होते. हे जग आता अधिक सावध झाले पाहिजे. ज्यांच्या हातांत सत्तेची सूत्रे आहेत, त्यांचे पाय मातीचे आणि चारित्र्य डागाळलेले असू शकते, हे एपस्टीन प्रकरणाने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.

हे 'पावरफुल' लोक जर स्वत:ला कायद्यापेक्षा मोठे समजत असतील, तर एपस्टीन फाईल्स हा त्यांच्या अहंकारावर पडलेला घाला आहे. आता गरज आहे ती यातील प्रत्येक गुन्हेगाराला जगाच्या चव्हाट्यावर आणून फासावर लटकवण्याची. अन्यथा, माणुसकीचा हा पराभव कायमचा इतिहासात नोंदवला जाईल.

# भेदभाव न बाळगता जनतेच्या उत्थानासाठी; शिवरायांच्या आदर्शाचे पालन राजकीय पुढाऱ्यांनी करावे....

छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती हा एक महाराष्ट्राचा उत्सवाचा सण असुन देशासाठी गौरवाचा आणि महत्वपूर्ण दिवस आहे. त्याचप्रमाणे जगाला गनीमीकाव्याची शिकवण छत्रपती शिवाजी महाराजांपासुन मिळाली आहे. त्यालाच आपण आज गोरीला वॉर सुध्दा म्हणतो. त्याची उत्पत्ती गनीमीकव्यातुनच झाली आहे.म्हणुनच जगात शिवाजी महाराजांच्या इतिहासाला आगळेवेगळे महत्त्व आहे. १९ फेब्रुवारीला देशासह संपूर्ण महाराष्ट्रात शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. सन १८६९ साली महात्मा जोतिबा फुले यांनी रायगडावरील शिवाजी महाराजांची समाधी शोधून काढली व त्यांच्या जीवनावर सर्वप्रथम पोवाडा लिहिला. शिवाजी महाराजांचे कार्य लोकांपर्यंत पोहोचावे यासाठी फुलेंनी सन १८७० साली शिवजयंतीची सुरूवात केली.ती पहीली शिवजयंती होती.त्यानंतर शिवजयंतीच्या माध्यमातून लोकांना एकत्र करण्याचे काम लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी केले. २० व्या शतकात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी देखील शिवजयंती साजरी केली व दोन वेळा शिवजयंतीच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या थाटात शिवजयंतीला सुरूवात झाली.महाराष्ट्र सरकारने २००१ पासून शके १५५१ (शुक्रवार १९फेब्रुवारी १६३०) ही शिवजयंतीची तारीख स्वीकारली त्यानुसार महाराष्ट्र सरकारने १९ फेब्रुवारी सार्वजनिक सुट्टी जाहिर केली.इतर संभाव्य तारखांमध्ये ६ एप्रिल १६२७ (वैशाख शुद्ध तृतीया) ही जन्म तारीख मानली जाते. त्यानुसार महाराष्ट्राबाहेर अनेक लोक शिवजयंतीचा दिवस म्हणून वैशाख शुद्ध तृतीया हा दिवस मानतात. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या दिनदर्शिकामध्ये शिवजयंतीची वेगवेगळी तारीख दाखवीली आहे. महाराष्ट्रात शिवजयंतीच्या तारखेला महत्व नसुन त्यांचे कर्तुत्व,त्यांचा त्याग,रयतेची जबाबदारी आणि लाखोंनी सैन्य घेऊन चढाई करणाऱ्या मोगल साम्राज्याचा अंत करणे हे महत्वाचे आहे.मी तर म्हणेल की शिवजयंती रोज साजरी व्हावी आणि शिवाजी महाराजांचे गोडवे जनतेपर्यंत पोहचवावे. तेव्हाच भारतात एकच नाही तर लाख शिवा तयार होतील. कारण शिवाजी महाराजांच्या पुण्यांयीनेच आज आपण ताठ मानाने आणि स्वाभिमानाने जगत आहोत. गनीमीकाव्याने मोगलायीचा व मोगल साम्राज्याचा अंत केला व हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. याचा गर्व महाराष्ट्रासह संपूर्ण भारताला आहे. आज भारताची गौरव गाथा जी आपण ऐकतो त्याचे संपूर्ण श्रेय शिवरायांनाच आहे.शिवाजी महाराज म्हणजे महाराष्ट्रासह संपूर्ण भारताची अबाध्य शक्ती आहे. शिवजयंतीच्या निमित्ताने शिवाजी महाराजांचे विचार समाजातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहचले पाहिजे.जानता राजा, रयतेचा राजा,हिंदवी स्वराज्याचे संस्थापक म्हणून जगभर ख्याती प्राप्त आहे.त्यामुळे केवळ महाराष्ट्रातच किंवा भारतातच नव्हे तर संपूर्ण जगभरात शिवाजी महाराजांचे नाव आदराने आणि स्वाभिमानाने घेतले जाते. तत्वज्ञ, इतिहासकार शिवाजी महाराजांवर अभ्यास करण्यासाठी भारतात येतात. १९ फेब्रुवारी रोजी सुमारे १११ पेक्षा अधिक देशांमध्ये शिवाजी महाराजांची जयंती साजरी केली जाते.

असे सांगण्यात येते की शिवाजी महाराजांकडे अनेक जातीवंत घोडे सुध्दा होते. कोणत्या घोड्यांचा वापर केव्हा करायचा हे त्यांना चांगलेच अवगत होते. शिवाजी महाराजांकडे मोती, विश्र्वास,तुरंगी, इंद्रायणी,गाजर,रणभीर,कृष्णा असे ७ घोडे होते.शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करतांना सुमारे ४०० गड आपल्या अधिपत्याखाली आणले होते. काही गड त्यांनी स्वत: बांधले तर काही किल्ले लढाया करून जिंकले. महाराजांचा एक गडकिल्ला म्हणजे स्थापत्यशास्त्र, व्यवस्थापन आणि गनिमी काव्याचे प्रतिकच होते. त्यामुळे मी केंद्र व राज्य सरकारला आग्रहाची विनंती करतो करतो की महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील संपूर्ण गडकिल्ल्यांची देखरेख करून सुसज्जीत केले पाहिजे. यातच शिवरायांना खरा मानाचा मुजरा ठरेल. कारण महाराष्ट्रासह संपूर्ण भारतातील गडकिल्ले ही भारताचे वैभव,धरोहर व शान आहे. कारण गडकिल्ल्यामुळेच शिवरायांच्या आठवणी पुन्हापुन्हा जागृत होतील.गडकिल्यांची सुरक्षा म्हणजे शिवजयंतीच्या निमित्ताने महाराजांना खरे अभिवादन व मानवंदना ठरेल. कारण शिवरायांनी मुठभर मावळ्यांच्या साक्षीने हिंदवी स्वराज्याची स्थापना केली व संपूर्ण किल्ले काबीज केले हा अभिमान महाराष्ट्रासह संपूर्ण भारताला आहे.त्यामुळे इतिहास जागृत ठेवण्यासाठी संपूर्ण किल्ले पर्यटनाच्या दृष्टीने व शिवरायांची आठवण या उद्देशाने किल्ल्यांचे जतन करणे गरजेचे आहे. कारण शिवाजी महाराज रयतेचे राजा होतेच.त्याचप्रमाणे त्यांच्यात दैवी शक्ती सुध्दा होती. ३९६ वर्षांनंतर आजही कुठल्याही गडकिल्ल्यांवर गेले तर ४ हजार फूट उंचीवर भर उन्हाळ्यात आपल्याला किल्ल्यावर स्वच्छ पाणी प्यायला मिळते. हा संपूर्ण शिवरायांचाच प्रताप आहे.असे सांगण्यात येते की वयाच्या १७ व्या वर्षी शिवरायांनी स्वत: डिझाईन करून रायगड किल्ला बांधल्याचे सांगण्यात येते.

आई जगदंबेच्या आशीर्वादाने शिवाजी महाराजांनी आपले संपूर्ण काम फत्ते केले व मावळ्यांमध्ये उर्जा निर्माण करून मोगलांना भुईसपाट केले.अबझल खानासारख्या महाकाय शक्तीशाली सरदाराला गनीमीकाव्याने यमलोक पोहचवीले. अशाप्रकारे मोगलांच्या संपूर्ण सरदारांना एक-एक करून धाराशाही करण्याचे काम शिवरायांनी व त्यांच्या सरदारांनी आणि मावळ्यांनी केले. हा देश साधुसंतांचा,थोरमहात्म्यांचा, क्रांतीकारकांचा व हिंदवी स्वराज्याची स्थापना करणाऱ्या शिवरायांचा देश आहे.याची जोपासना महाराष्ट्र व केंद्र सरकारने करावी अशी मी आग्रहाची विनंती करतो.महाराष्ट्रातील १२ गडकिल्ले युनेस्कोच्या यादीत समावेश करण्यात आले ही महाराष्ट्रासह देशासाठी आनंदाची व अभिमानाची गोष्ट आहे.यामुळे जागतिक वारसा यादीत भारताचे नाव समाविष्ट झाले असून पर्यटनाला मोठी चालना मिळणार आहे.देशात वाढते अत्याचार रोखण्यासाठी, महागाई,शेतकरी व कामगारांच्या समस्यांचे निवारण करण्यासाठी शिवरायांच्या तत्त्वांच्या अनुकरणाचा वापर करून केंद्र व राज्य सरकारने रयतेच्या सुरक्षेची व सुख-समृध्दीची जबाबदारी स्वीकारावी. यातच खरे शिवजयंतीचे महत्त्व दिसून येईल.त्याचप्रमाणे शिवजयंतीच्या निमित्ताने महाराष्ट्र सरकारने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपन करायला हवे.यामुळे संपूर्ण गडकिल्ले सुशोभित होईल व जिकडे-तिकडे आपल्याला हिरवागार गालीचा दिसून येईल. त्याचप्रमाणे शिवजयंतीच्या निमित्ताने बदलते हवामान लक्षात घेता वृक्ष लागवड सर्वच स्तरातून झाली पाहिजे.याकरीता प्रत्येक व्यक्तीने जर वृक्ष लागवड केली तर प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात, फळात आपल्याला शिवाजी महाराजांचे दर्शन अवश्य होईल व त्यांच्या आठवणी अनंत काळापर्यंत टीकुण राहील.त्यामुळे शिवजयंतीचे औचित्य साधून सरकार, राजकीय पक्ष,शाळा -महाविद्यालये,सामाजिक संघटना,शिव भक्त व देशातील नागरिक यांनी प्रत्येकांनी एक तरी झाड लावले पाहिजे. यामुळे वाढत्या प्रदुषणावर मात करण्यास मोठी मदत होईलच व ऑक्सिजनची मात्रा वाढेल.त्याच प्रमाणे गुरांना चारा व संपूर्ण जीवसृष्टीला ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल. त्यामुळे एकाच दिवशी लाखो झाडे लावल्या जातील ही झाडे अनेक युगांपर्यंत सर्वांच्याच स्मरणात राहिल. छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त माझा मानाचा मुजरा.जय हिंद. हर हर महादेव

'जय भवानी!जय शिवाजी!'

**-लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार,**
**नागपूर.**

# 'ज्या दिवशी दुर्घटना घडली त्या दिवशीच...', अजित पवार विमान दुर्घटनेवर सुनील तटकरेंचं विधान; फडणवीसांकडे मोठी मागणी



उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या विमान दुर्घटनेची सीबीआय चौकशी करावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते सुनील तटकरे यांनी केली आहे. तपासातून जे सत्य समोर येईल ते राज्य आणि देशातील जनतेसमोर ठेवावं असंही त्यांनी म्हटलं आहे. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची भेट घेतल्यानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना ही माहिती दिली आहे. मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन आपण सीबीआय चौकशीची मागणी केल्याचं सांगितलं आहे.

ते म्हणाले की, आज मुख्यमंत्र्यांची मी, सुनेत्रा पवार, प्रफुल्ल पटेल, हसन मुश्रीफ आणि पार्थ पवार यांनी भेट घेतली. दादांचा जो अपघाती मृत्यू झाला त्यासंदर्भातील निवेदन देत सीबीआय चौकशीची मागणी केली आहे. मुख्यमंत्र्यांनी आम्हाला उद्या केंद्रीय गृहमंत्र्यांकडे राज्य सरकारकडून यासंदर्भात पत्रव्यवहार केला जाईल. राष्ट्रवादी काँग्रेसकडून सीबीआय चौकशीसंदर्भात केलेल्या मागणीसंदर्भात माझ्याकडून पावलं उचलली जातील असं आश्वस्त केलं आहे.

ज्या दिवशी दुर्घटना घडली त्या दिवशीच त्या खात्याचे केंद्रीय मंत्री नायडू, मुरलीधर मोहोळ तिथे होते. त्यामुळे एक स्वायत्त संस्था अशा पद्धतीच्या दुर्देवी विमान अपघाताच्या संदर्भात भारत सरकाराने आधीच नेमली आहे. त्या स्वायत्त यंत्रणेने तपास सुरु केल्याचं त्यांनी आधीच जाहीर केलं आहे. स्वायत्त यंत्रणाही तपास करेलच, पण सीबीआय तपास करत असताना आणखी व्यापकतेने तपास होऊ शकते. ज्यावेळी स्वायत्त यंत्रणा तपास करतात त्यावेळी बाहेरील अपघाती प्रकरणाचा तपास करणाऱ्यांचीही मदत तिथे होऊ शकत असते. त्यामुळे आमची मागणी आहे की, सखोल तपास व्हावा. जे मुद्दे उपस्थित होतील त्यासह हा तपास केला जावा आणि तो निष्कर्ष राज्यासह देशातील जनतेसमोर ठेवावा. यामुळेच आम्ही आज मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन चर्चा केली, अशी मागणीही सुनील तटकरेंनी केली आहे.

नरहरी झिरवळ प्रकरणात काय सल्ला द्याल असं विचारलं असता ते म्हणाले की, प्रतिमा निश्चित मलीन होते. त्यामुळे आपल्या कार्यालयात नेमला जाणारा स्टाफ चिकित्सा करुनच नेमला जावा. स्पष्टपणा असावा यासाठी अशा प्रकारची कोणतीही गोष्ट खपवून घेतली जाणार नाही असं सांगावं. याची खबरदारी सर्वांनी घेतली पाहिजे. अशा घटनांमुळे सरकारच्या प्रतिमेवर परिमाण होत असतो, मंत्र्याच्या अख्त्यारित बाब येते त्यांच्याही प्रतिमेवर परिणाम होत असतो. त्यादृष्टीने आम्ही चर्चा केली असून, इतरही सर्वांना त्यापद्धतीच्या सूचना दिल्या आहेत.

कोणताही निर्णय मंत्र्यांच्या स्वाक्षरीशिवाय होत नसतो. अशावेळी असे आदेश काढणाऱ्यांची चौकशी व्हावी. त्यांच्यावर कारवाई झालीच पाहिजे. वहिनींनीही उपमुख्यमंत्री म्हणूनही तशा सूचना दिल्या आहेत अशी माहिती त्यांनी दिली.

## सव्यसनापासून दूर राहून वारकरी संप्रदायाची संस्कृती टिकवावी

## - मनोज जरांगे पिशोर येथे हरिनाम सप्ताहाला व शिवचरित्र पारायण सोहळ्याला भेट

**( समाजाने व्यसनापासून दूर राहावे, गावातील सर्व मुलांनी व तरुणांनी हरिपाठ, भजन, कीर्तन याला वेळ देऊन आपली संस्कृती जपावी असे आवाहन मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी केले. )**



**आत्ताच एक्सप्रेस कन्नड ग्रामीण प्रतिनिधी/सुनिल निकम /** कन्नड तालुक्यातील पिशोर येथे जाधव गल्ली येथील मोठा गणपती परिसरातील अखंड हरीनाम सप्ताह व शिवचरित्र पारायण सोहळ्याला मंगळवारी (ता.१७ त्यांनी भेट दिली. त्या प्रसंगी ते बोलत होते. आपपसातील जमिनीचे, भाऊबंदकीचे तंटे मिटवून सर्वांनी एकजुटीने राहावे, दिवसभर पारावर, टपरीवर रिकामे बसून वेळ व्यर्थ घालवण्यापेक्षा शिक्षण घ्या, कष्ट करा व आई वडिलांना शेती कामात मदत करा. अहंकार सोडून एकमेकांना सहकार्य करा. भविष्यात गरज पडल्यास पुन्हा एकदा समाजाने पुर्ण ताकदीने एकत्र येण्याची तयारी ठेवावी असे पुढे बोलतांना त्यांनी सांगितले. येथील प्रबोधन प्रतिष्ठानच्या सदस्यांनी आठवड्याभरापुर्वी मनोज जरांगे पाटील यांची भेट घेऊन त्यांना हरिनाम सप्ताहाला व शिवचरीत्र सोहळ्याला उपस्थित राहण्याचे निमंत्रण दिले होते. या निमंत्रणाचा स्विकार करून मनोज जरांगे पाटील यांचे मंगळवारी पिशोर येथे जात असताना नादरपूर पिंपरखेडा येथे यांचा भव्य सत्कार करण्यात आला संध्याकाळी पाच वाजता पिशोर येथील सिल्लोड नाका येथे आगमन झाले.

येथून दुचाकी रॅलीद्वारे त्यांचे सप्ताहस्थळी आगमन झाले. दरम्यान गावातील जामा मस्जिद परिसरात मुस्लिम समाजाने त्यांचा भव्य सत्कार केला. यावेळी जामा मस्जिद परिसरात हजारो मुस्लिम बांधव उपस्थित होते.

# विकासासोबत पर्यावरणपूरक उपाय अंगीकारण्याचा शासनाचा प्रयत्न - पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे

**मुंबई,/** औद्योगिकीकरण आणि नागरीकरणासोबत प्रदूषणाची समस्या अपरिहार्य असली तरी आता विकासासोबत पर्यावरणपूरक उपाय अंगीकारण्याचा शासनाचा स्पष्ट प्रयत्न असून विकासाच्या प्रत्येक टप्प्यात हवामान बदलाचा विचार करूनच निर्णय घेतले जात असल्याचे राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी स्पष्ट केले.

'मुंबई क्लायमेट वीक' उपक्रमाच्या 'बिट द हिट' - स्केलिंग सस्टेनेबल कुलिंग-इनसाईट फ्रॉम बी कुल या परिसंवादात पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे बोलत होत्या. यावेळी संयुक्त राष्ट्र संघाच्या पर्यावरण विभागाचे संचालक मार्टिन क्रूसे, स्विस एजन्सी फॉर डेव्हलपमेंट अँड कोऑपरेशनचे प्रमुख - सल्लागार फिलीप सास, एमएमआरडीएचे मुख्य दक्षता व नियोजन अधिकारी शंकर देशपांडे, आदींनी सहभाग घेतला.

मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, नव्या इमारतींसाठी पावसाचे पाणी साठवण, पाण्याचा पुनर्वापर, सौरऊर्जेचा वापर, हरित ऊर्जा, कमी सिमेंट वापर आणि उच्च तंत्रज्ञानाधारित बांधकाम यावर भर देण्यात येत असल्यामुळे बांधकाम जलद होण्यासोबत प्रदूषणही कमी होईल. पूल, मेट्रो, बोगदे आणि इतर पायाभूत प्रकल्पांमध्येही पर्यावरणपूरक तंत्रज्ञान वापरण्याचे निर्देश दिले आहेत. उष्णतेचा परिणाम कमी करण्यासाठी इमारतींवर सौर पॅनेल, विशेष छत कोटिंग आणि कमी पाणी वापरणाऱ्या तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यावर भर दिला जात आहे.

लोकसंख्या वाढ आणि नागरीकरणामुळे होत असलेल्या जंगलतोडीच्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड आणि जनजागृती मोहिमा राबवल्या जात आहेत. विद्यार्थ्यांपासून स्वयं-सहाय्य गटांपर्यंत आणि ग्रामीण भागातील नागरिकांना या मोहिमेत सहभागी करून पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण केली जात आहे. बीट द हीट संकल्पनेअंतर्गत नागरिकांना उष्णतेच्या दुष्परिणामांबाबत जागरूक केले जात असून राज्यातील सुमारे ४० शहरे या उपक्रमाशी जोडली गेल्याचे मंत्री पंकजा मुंडे यांनी नमूद केले. मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक यासारख्या वाढत्या शहरांसाठी समन्वित हवामान आराखडे तयार करण्यात आले असून स्थानिक स्वराज्य संस्था, पर्यावरण विभाग, नगरविकास, वन आणि आदिवासी विभाग यांच्या संयुक्त प्रयत्नांतून त्यांची अंमलबजावणी सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. हवामान प्रश्न हा लोकल टू ग्लोबल असा असल्याचे सांगत प्रत्येकाने स्थानिक पातळीवर उपाययोजना केल्यास जागतिक परिणाम सकारात्मक होतील, असे त्यांनी नमूद केले. ग्रामीण भागातील शेतकरी व मजुरांना उष्णतेचा सर्वाधिक फटका बसतो, याकडे लक्ष वेधत त्यांनी त्यांच्या आरोग्य, कार्यक्षमता आणि उत्पादकतेवर परिणाम होत असल्याची चिंता व्यक्त केली. कामाचे वेळापत्रक बदलणे, उष्णतेबाबत जागरूकता आणि संरक्षणात्मक उपाय यांची गरज आहे. तंत्रज्ञानाची गरज मान्य करत अतिरेक टाळणे आवश्यक आहे. हवामान बदलामुळे वाढणारी उष्णता ही आरोग्य आणि उत्पादकतेसाठी गंभीर असल्याचे नमूद करत त्यांनी शहरी भागात शीतलता उपाय सर्वांसाठी उपलब्ध व्हावेत, हा उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. हवामान कृती ही केवळ धोरणापुरती मर्यादित न ठेवता समाजाच्या प्रत्येक घटकाने सामूहिक जबाबदारी म्हणून स्वीकारावी, असे आवाहन त्यांनी केले.

**उष्णतेचा धोका गंभीर; शीतलतेचा हक्क सर्वांसाठी - मार्टिन क्राउसे**

जागतिक तापमानवाढीचे अंदाज खरे ठरल्यास परिस्थिती अत्यंत गंभीर होऊ शकते, असा इशारा संयुक्त राष्ट्र संघाच्या पर्यावरण विषयक कार्यक्रमाचे संचालक मार्टिन क्राऊसे यांनी मुंबई क्लायमेट वीकमध्ये दिला. औद्योगिकपूर्व सरासरीच्या तुलनेत तापमान २.६ ते २.८ अंश सेल्सिअसने वाढण्याच्या मार्गावर असून त्याचे थेट परिणाम शहरांवर जाणवतील, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

उष्णतेला उत्तर म्हणजे शीतलता असल्याचे स्पष्ट करून ते म्हणाले की, शीतलता ही केवळ श्रीमंतांची मक्तेदारी नसून आरोग्य आणि मानवी सन्मानाशी संबंधित मूलभूत गरज आहे.

याच उद्देशाने विविध भागीदारांसह बीट द हीट आणि बीकूल उपक्रम राबवले जात असल्याचे त्यांनी नमूद केले. महाराष्ट्रातील अनेक शहरांनी बीट द हीट कार्यक्रमात सहभाग घेतल्याचे समाधान त्यांनी व्यक्त केले.



गेल्या दशकात उष्णतेची लाट लवकर जाणवू लागल्याचे निरीक्षण नोंदवत त्यांनी मुंबईसारखी शहरे तापमानवाढीस अत्यंत संवेदनशील असल्याचे सांगितले. हवामान कृतीचे नेतृत्व संयुक्त राष्ट्रसंघ किंवा केवळ राष्ट्रीय सरकारांकडून नव्हे, तर शहर, राज्य आणि नागरिक पातळीवरून पुढे आले पाहिजे. स्थानिक नेतृत्व आणि लोकसहभाग यामुळेच हवामान बदलाला प्रभावी उत्तर देता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे मुख्य नियोजन अधिकारी शंकर देशपांडे म्हणाले की, वाढत्या उष्णतेचा फटका आता केवळ मोठ्या शहरांपुरता मर्यादित नसून लहान शहरांनाही बसू लागला आहे. दाट लोकवस्तीमुळे मुंबईसारखी शहरे अधिक संवेदनशील ठरत असल्याने बीट द हीट, बी कूल ही संकल्पना सर्वांनी एकत्र राबवण्याची गरज आहे. उष्णतेचा सामना करण्यासाठी बांधकामाच्या सुरुवातीच्या टप्प्यापासून पर्यावरणपूरक नियोजन आवश्यक आहे, इमारतींची रचना, साहित्य निवड, पॅसिव्ह कूलिंग, पाणी पुनर्वापर, ऊर्जा कार्यक्षमता आणि हरित प्रमाणपत्रे यांचा अवलंब मोठ्या प्रमाणावर करणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मुंबई आणि विस्तारित शहरी भागात उभ्या राहत असलेल्या नव्या प्रकल्पांमध्ये हे तत्त्व लागू करण्याची मोठी संधी असून प्रत्येक स्तरावर भूखंड, परिसर आणि शहर नियोजन झाले तर शहर आपोआप शाश्वत बनेल. शासन, स्थानिक संस्था, तज्ज्ञ आणि नागरिक यांनी संयुक्तपणे काम केल्यास बीट द हीट उपक्रम मुंबईतून आदर्श नमुना ठरू शकतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांना पर्यावरण मंत्री मुंडे यांनी समर्पक उत्तरे देऊन समाधान केले.

# महारेशीम अभियान २०२६: जनजागृती वाहनास हिरवा झेंडा
# जिल्ह्यात १०७२ शेतकऱ्यांची ११२२ एकर क्षेत्रावर तुती लागवड

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी/** महारेशीम अभियानाच्या फिरत्या जनजागृती वाहनास जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकूणे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून आज रवाना करण्यात आले. जिल्ह्यात १०७२ शेतकऱ्यांनी ११२२ एकर क्षेत्रावर तुती लागवड केली असून सहा खाजगी चॉकी/बाल अळी संगोपन केंद्र सुरू आहेत. जिल्ह्यात रेशीम उत्पादन वाढीसाठी विविध योजना राबविण्यात येत असून शेतकऱ्यांनी या योजनांचा लाभ घेऊन रेशीम शेतीकडे वळावे असे आवाहन अपर जिल्हाधिकारी अडकुणे यांनी यावेळी केले.

**आपले सरकार पोर्टलवरुन नोंदणी सुविधा**

रेशीम उद्योगाला चालना देण्यासाठी 'महारेशीम अभियान- २०२६' राबविण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग घोरण २०२३-२८ अंतर्गत रेशीम शेतीला केंद्रस्थानी ठेवत तुती लागवड व टसर रेशीम उद्योगासाठी शेतकरी उद्योजकांची नोंदणी, प्रचार व जनजागृती करण्याचा उद्देश या अभियानामागे आहे. अभियान काळात 'आपले सरकार' पोर्टलवरून नवीन शेतकरी व उद्योजक नोंदणीला विशेष प्रोत्साहन देण्यात येणार असून, रेशीम संचालनालयाच्या विविध सेवांची व्यापक प्रसिद्धी केली जाणार आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ११ मार्च पर्यंत अभियान राबविले जाणार आहे.

माजी रेशीम उपसंचालक दिलीप हाके,केंद्रीय रेशीम मंडळाचे विभागीय विस्तार केंद्राचे शास्त्रज्ञ अंकुश गाडगे, रेशीम विकास अधिकारी बी.डी.डेंगळे, प्रादेशिक रेशीम कार्यालयाचे तांत्रिक अधिकारी रविंद्र सांगळे,लेखाधिकारी पोपट चौधरी व जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

शेतकऱ्यांनी पारंपारिक पिकांऐवजी रेशीम शेतीला प्राधान्य दिल्यास अधिक व निरंतर उत्पन्न मिळू शकते. जिल्ह्यातील हवामान रेशीम शेतीस अत्यंत अनुकूल आहे. पारंपारिक पिकांना पर्याय म्हणून रेशीम शेती अनेक दृष्टीने फायदेशीर आहे. जालना व बीड येथे जवळच बाजारपेठ उपलब्ध आहे. रेशीम शेतीबाबत आवश्यक तांत्रिक कौशल्य आत्मसात करून प्रायोगिक तत्त्वावर शेती करावी व कमी कालावधीत सातत्यपूर्ण उत्पन्न देणाऱ्या रेशीम शेतीकडे शेतकऱ्यांनी वळावे यासाठी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी नवीन तुती लागवडीसाठी नोंदणी करून रेशीम शेतीकडे वळावे, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे यांनी यावेळी केले.

**११०० एकर नोंदणीचे उद्दिष्ट**

सध्या जिल्ह्यात १०७२ शेतकऱ्यांनी ११२२ एकर क्षेत्रावर तुती लागवड केली असून सहा खाजगी चॉकी/बाल अळी संगोपन केंद्र सुरू आहेत. त्याद्वारे रेशीम शेतकऱ्यांना सुरुवातीचे आठ ते दहा दिवस लहान अळ्याचे संगोपन करून पुरवठा केला जातो. तसेच दोन रेशीम धागा निर्मिती केंद्र कार्यान्वित असून तेथे शेतकऱ्यांचे कोष खरेदी करून धागा निर्मिती केली जाते. जिल्ह्यासाठी रेशीम विभागास ३५० एकर, कृषी विभागास ४०० एकर व जिल्हा परिषदेस ३५० एकर असे एकूण ११०० एकर नवीन शेतकरी नोंदणीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे.

रेशीम विभागाने जिल्ह्यातील निवडक १४६ गावांमध्ये ३५० एकर लक्षाकांपोटी ७०० एकर नवीन शेतकरी नोंदणीचे नियोजन केलेले आहे. महा रेशीम अभियान कालावधीमध्ये निवड केलेल्या गावांमध्ये प्रत्यक्ष भेटी देऊन नवीन शेतकरी नोंदणीसाठी रेशीम उद्योगाविषयी माहिती, मार्गदर्शन, जन जागृती,प्रचार व प्रसिद्धी केली जाणार असल्याचे रेशीम विकास अधिकारी बी.डी.डेंगळे यांनी सांगीतले.

**विविध योजनांतर्गत अर्थसहाय्य**

रेशीम उद्योगाच्या वाढीसाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (जी-राम- जी) अंतर्गत अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी तीन वर्षात ८९५ मनुष्य-दिवसांअंतर्गत मजुरी २ लक्ष ७९ हजार २४० रुपये व साहित्यासाठी १ लक्ष ५३ हजार रुपये असे एकूण ४ लक्ष ३२ हजार २४० रुपये अनुदान दिले जाते. तसेच केंद्र पुरस्कृत सिल्क समग्र योजनेअंतर्गत तुती लागवड, सिंचन संच, कीटक संगोपनगृह बांधकाम, संगोपन साहित्य व निर्जंतुकीकरण औषधींसाठी एकूण ३ लक्ष ७५ हजार रुपये अनुदान देण्यात येते. सिल्क समग्र-२ अंतर्गत बहुभूधारक शेतकऱ्यांना २ एकर तुती लागवडीसाठी ५ लक्ष ६२ हजार ५०० रुपये अनुदान मिळते.




तसेच कृषी विभागाच्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना (पोकरा) अंतर्गत तुती लागवडीसाठी ४५ हजार रुपये, रेशीम कीटक संगोपन गृहासाठी २ लक्ष ४३ हजार ७५० रुपये व संगोपन साहित्यासाठी ३६ हजार ३७५ रुपये, असे एकूण ३ लक्ष २५ हजार १२५ रुपये अनुदान दिले जाते.सन २०२६-२७ मध्ये शेतकऱ्यांनी समूहाने मनरेगा, सिल्क समग्र-२ व पोकरा योजनेंतर्गत तसेच वैयक्तिक स्वरूपात नवीन तुती लागवडीसाठी नोंदणी करावी, असे आवाहन रेशीम विकास अधिकारी बी.डी.डेंगळे यांनी केले आहे.

ऑनलाईन नोंदणी:- https://textileservices.mahaonline.gov.in/ या लिंकवरून नोंदणी करावी अथवा आपले सरकार पोर्टलवर वस्त्रोद्योग विभाग निवडावा.

अधिक माहितीसाठी जिल्हा रेशीम कार्यालय, ज्ञानपिठ कॅम्पस नं.२,पहिला मजला, प्लॉट नं.टी-१८,

एम आय डी सी एरीया, गरवारे स्टेडीयम समोर,नारेगाव मेन रोड, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर पिन-४३१००६, येथे संपर्क साधावा. दूरध्वनी क्रमांक : दुरध्वनी क्र.०२४०-२९९४६४७ ८६६९०९९४२२, ९७६४७०६६५२, ७०२०७७४५०५, ९९२३८९७७६७.

# गुंतवणूकदार, निर्यातदारांसाठी शुक्रवारी (दि.२०) कार्यशाळा

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी/** जिल्ह्यातील गुंतवणूकदार, निर्यातदार व निर्यातक्षम उद्योग घटक यांच्यासाठी महानिर्यात इग्नाईट कव्हेंशन २०२६ चे आयोजन शुक्रवार दि.२० रोजी आयोजीत करण्यात आली आहे. ही कार्यशाळा बजाज भवन, सी आय एम ए सभगृह, पी-२, रेल्वे स्टेशन एमआयडीसी, छत्रपती संभाजीनगर येथे स्काळी ९ ते सायं. ५ यावेळात होणार आहे, असे जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक वय.आर सारणीकर यांनी कळविले आहे.

या कार्यशाळेत जिल्ह्यातील प्रमुख उद्योग क्षेत्राबबत चर्चासत्र, गुंतवणूकीच्य संधी, इतर क्षमता असलेल्या क्षेत्रातील गुंतवणूक व व्यवसाय संधीबाबत चर्चा, उद्योजकांचे अनुभव इ. बाबींचा समावेश आहे. जिल्हा उद्योग केंद्र, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मैत्री कक्ष, उद्योग संचालनालय, मुंबई सीडबी बँक, जिल्ह्यातील बँका, उद्योग संघटना, शैक्षणिक संस्था, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, मिटकॉन, कौशल्य विकास व रोजगार व जिल्ह्यातील संबंधीत शासकीय यंत्रणांचे प्रमुख आदी सहभागी होतील. तरी या कार्यशाळेस जिल्ह्यातील सुक्ष्म, लघु, मध्यम उद्योग, निर्यातदार, निर्यातक्षम उद्योजक, नव उद्योजक, शेतकरी सहकारी उत्पादक संस्था, प्रक्रिया उत्पादक उद्योग घटक, औद्योगिक संघटना यांनी उपस्थित रहावे,असे आवाहन महाव्यवस्थापक वाय. आर. सारणीकर यांनी केले आहे.

**राज्य अन्न आयोगाच्या पथकाकडून शासकीय गोदाम पाहणी**

छत्रपती संभाजीनगर, दि.१७(जिमाका)- राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे व त्यांच्या पथकाने आज शासकीय गोदाम व अन्य संस्थांची पाहणी केली. तसेच शालेय पोषण आहार स्वयंपाक घर आदी ठिकाणीही भेटी देऊन पाहणी केली व प्रत्येक विद्यार्थ्याला दर्जेदार व पोषणमूल्य असलेले अन्न पुरविले जाईल याची दक्षता घेण्याचे निर्देश संबंधितांना दिले.

राज्य अन्न आयोग सोमवार दि.१६ पासून जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले आहेत. अध्यक्ष महेश ढवळे, सदस्य सचिव सुभाष राऊत, बबन मसाले यांच्या पथकाने आज शालेय पोषण आहार स्वयंपाक घर, इस्कॉन गोदाम, अन्न अमृत फाऊंडेशनचे मध्यवर्ती स्वयंपाकघर आणि शासकीय अन्न गोदामांना भेटी देऊन पाहणी केली. शालेय विद्यार्थ्यांसाठी शिजवण्यात येणाऱ्या अन्नाचा दर्जा, साठवणूक व्यवस्था आणि वितरणाची पारदर्शकता याबाबत बारकाईने तपासणी केली.

तपासणी दरम्यान श्री. ढवळे यांनी निर्देश दिले की,आहार शिजवतांना त्यात उच्च दर्जाच्या व चांगल्या गुणवत्तेच्या खाद्यपदार्थांचाच वापर करण्यात यावा. मुलांच्या आरोग्याशी तडजोड होता कामा नये असेही स्पष्ट सांगितले. त्यांनी सांगितले की, अन्न पुरवठा करणाऱ्या कंत्राटदारांनी आणि संस्थांनी अन्न सामुग्रीचा पुरवठा करतांना अन्न सुरक्षा मानके कायद्यानुसार्व अन्न पदार्थ्यांची अधिकृत प्रयोगशाळेतुन तपासणी करणे बंधनकारक असून केवळ उत्कृष्ट दर्जाच्या पदार्थांचाच पुरवठा केला जावा, असे सांगितले. पाहणी प्रसंगी जिल्हा पुरवठा अधिकारी, शिक्षण विभाग, अन्न व औषध प्रशासन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# अपघातप्रवण स्थळांबाबत ऑनलाईन भौगोलिकस्थान माहिती सेवांचा सहयोग घ्या-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी/** जिल्हा रस्ता सुरक्षा समिती बैठक .. प्रवास करतांना इंटरनेट वरुन विविध भौगोलिकस्थान माहिती सेवांचा सहयोग प्रवाशांकडून घेतला जातो. अशा सेवांचा सहयोग वाहनचालकांना मोबाईलवरुन अपघातप्रवण स्थळांबाबत पूर्वसुचना देण्याबाबत घ्यावा,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले.

जिल्हा रस्ता सुरक्षा समितीची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय काठोळे, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ, अधीक्षक अभियंता एस.एस.भगत, कार्यकारी अभियंता एस.के. चव्हाण, एस.जी. केंद्रे, श्रीमती प्रिया पुजारी , पोलीस निरीक्षक महामार्ग विभाग गजानन जाधव आदी उपस्थित होते.

सेव्ह लाईफ फाऊंडेशन या संस्थेने सन २०२३-२४ मध्येकेलेल्या सर्व्हेक्षणाच्या अहवालानुसार, जिल्ह्यात २०९ अपघातप्रवण स्थळे आहेत. जिल्ह्यात शून्य अपघात अभियान राबविण्याच्या दृष्टिने उपाययोजना राबविणे अपेक्षित असून त्यासाठी अपघातप्रवण स्थळांवरील अपघात प्रवणता निर्मूलन करण्यास प्राधान्य देण्यात येत आहे. त्यासाठी संबंधित सर्व विभागांनी संयुक्त प्रयत्न करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले आहेत.

त्याअनुषंगाने राष्ट्रीय महामार्ग विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ,महानगरपालिका, आरोग्य विभाग, परिवहन विभाग, गृह विभाग, शिक्षण विभाग अशा सर्व विभागांनी संयुक्तपणे उपाययोजना राबवावयाच्या आहेत.

जिल्ह्यात नक्की करण्यात आलेल्या अपघातप्रवण स्थळांचे भौगोलिक अंकन करण्यात आले आहे. त्या अंकनाची माहिती भौगोलिक स्थान माहिती सेवा पुरविणाऱ्या संस्थांना द्यावी. त्यानुसार वाहन चालक वाहन चालवितांना या सेवांचा वापर करेल व रस्त्यात पुढे येणाऱ्या अपघातप्रवण स्थळाबाबत त्यास आगाऊ सुचना मोबाईलद्वारे दिली जाईल. हा संबंधित डाटा अशा संस्थांना देऊन त्या सेवांचा उपयोग अपघात टाळण्यासाठी करावा,असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले. तसेच आवश्यक स्थापत्य उपाययोजनांबाबत सर्व्हेक्षण करुन त्याचे अंदाजपत्रक द्यावे. त्यात गतिरोधक तयार करणे, फलक लावणे, वाहन चालकाच्या रस्त्यातील दृष्यमानतेतील अडथळे दुर करणे, त्यासाठी रडार व्हेईकल वापरणे, अपघात झाल्यास वैद्यकीय उपचार देण्याचा कालावधी कमी करणे, सर्व संबंधित यंत्रणांचे प्रशिक्षण देणे, जनजागृती करणे इ. उपाययोजना सर्व संबंधित विभागांनी मिळून राबवावयाच्या आहेत,असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले.

# वेरूळ येथे कुस्त्यांचा थरार! महाशिवरात्रीनिमित्त शेकडो वर्षांची परंपरा उत्साहात साजरी

**आत्ताच एक्सप्रेस**
**खुलताबाद प्रतिनिधी** / जागतिक वारसा लाभलेल्या आणि बारावे ज्योतिर्लिंग श्री घृष्णेश्वर मंदिरामुळे जगभर लौकिक असलेल्या वेरूळ (ता. खुलताबाद) येथे महाशिवरात्री महोत्सवानिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही कुस्त्यांच्या भव्य आखाड्याचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामपंचायत प्रशासनाच्या वतीने आयोजित या दंगलीत जिल्हाभरातील नामवंत पैलवानांनी शड्डू ठोकल्याने कुस्ती शौकीनांच्या डोळ्यांचे पारणे फिटले.

शेकडो वर्षांची परंपरा आजही कायम

वेरूळसारख्या ग्रामीण भागात कुस्तीची शेकडो वर्षांची परंपरा आजही तितक्याच उत्साहात जपली जात आहे. महाशिवरात्रीच्या मुख्य यात्रेनंतर दुसऱ्या दिवशी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मैदानावर हा आखाडा रंगतो. यावर्षीही सोमवारी दोन सत्रात या कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले होते.

लहान-मोठ्या कुस्त्यांचे आयोजन

या आखाड्याचे वैशिष्ट्य म्हणजे अगदी २० रुपयांच्या 'शिरपा'पासून ते ११०० रुपयांच्या बक्षीस रकमेपर्यंतच्या अटीतटीच्या निकाली कुस्त्या येथे लावल्या जातात. जिल्हाभरातील ग्रामीण भागातून







आलेल्या शेकडो मल्ल पैलवानांनी या स्पर्धेत आपला कस लावला. अनेक वर्षांपासून जिल्हयातील नामवंत पैलवान या मैदानात आपली कला सादर करण्यासाठी आवर्जून हजेरी लावतात.

सुनियोजित नियोजन आणि मान्यवरांची उपस्थिती

वेरूळ ग्रामपंचायतीने या स्पर्धांसाठी विशेष कुस्ती पंच कमिटीची स्थापना केली होती. या कमिटीच्या माध्यमातून स्पर्धांचे उत्तम नियोजन करण्यात आले. या प्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लक्षणीय होती:

पंच कमिटी व पदाधिकारी: अध्यक्ष चंदू राठोड, उपाध्यक्ष नामदेव बकाल, साहेबराव पांडव, हंसराज चव्हाण.

प्रमुख उपस्थिती: माजी सरपंच प्रकाश पाटील, उपसरपंच विजय राठोड, विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन मूलचंद चव्हाण, जयलाल सुलाने, माजी सरपंच साहेबसिंग गुमलाडू. सहकार्य: ग्रामसेवक आर. जी. गायकवाड, पोलीस पाटील रमेश ढिवरे, सामाजिक कार्यकर्ते दिनेश श्रीसुंदर, माजी सदस्य सूर्यकांत सन्नानसे, ग्रामपंचायत कर्मचारी शेख नईम, राजू आडे. या आखाड्यासाठी वेरूळसह परिसरातील कुस्तीप्रेमी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

ग्रामीण संस्कृतीचा वारसा सांगणारा हा कुस्तीचा आखाडा अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला.

# महाशिवरात्रीच्या पर्वकाळात झाला,हिंदू - मुस्लिम एकता संगमाचा उदय...

**आत्ताच एक्सप्रेस**
**कन्नड प्रतिनिधी/ उदय कुलकर्णी** / दि.१५ शहरातील पुरातन व ऐतिहासिक असलेले श्री लिंगेश्वर महादेव मंदिराच्या परिसरात महाशिवरात्रीच्या पर्वकाळात हिंदू -मुस्लिम एकतेचा संगमाचा उदय झाल्याचे दिसून आले. दि.१५ रोजी कन्नड नगरीचे युवा उद्योगपती भाजपा नेते श्री. मनोज पुष्पाबाई केशव पवार हे दरवर्षीप्रमाणे आपल्या धर्म पत्नी समवेत श्री लिंगेश्वर महादेव मंदिरात पूजेसाठी साठी गेले असता ,सदर ठिकाणी कन्नड नगरीचे प्रथम नागरिक फरीन बेगमचे पती तथा काँग्रेसचे नेते अब्दुल जावेद शेठ यांनीही मंदिरास भेट देऊन या पर्व काळातील पूजेचा महिमा जाणून घेतला. तसेच उपस्थित भक्तगणांना शुभेच्छा देऊन युवा उद्योगपती श्री मनोज पवार कुटुंबीयांद्वारे आयोजित फराळ पाण्याचा स्वाद घेऊन त्यांचे हस्तेही भाविकांना फराळाचे वाटप करण्यात आले. विशेष म्हणजे या पर्वकाळात त्यांनी भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून नगरपरिषदेच्या वतीने मंदिर परिसरात साफसफाईची मोहीम ही राबविली, गेल्या अनेक वर्षांच्या कालावधीत कोणत्याही नगराध्यक्षास अशी मोहीम राबविण्यासाठी वेळ मिळाला नाही, पण आज एका मुस्लिम नगराध्यक्षांच्या पतीने ही मोहीम राबवून सदर मंदिराचा परिसर स्वच्छ करून पूजेसाठी येणाऱ्या भाविकांची सोय केली.

. या राबविलेल्या मोहिमेचे उपस्थित भक्तगणांकडून कौतुक होतांना दिसून आले.






यावेळी श्री. गिरी बाबा, दाभाडे सर, मनीष शेट्टी,संजीव माळी,भाजपाचे पवन ठाकूर,अल्पसंख्यांक जिल्हाउपाध्यक्ष इम्रान भाई शेख, शंकर राऊत, आदित्य देशमुख, राजू भाई,अजय सातदिवे लखन पवार,ओमकार बोधक, गोविंद गवळी, शिबिराज नरवडे,सोनू धिवर, सतीश गायकवाड स्वप्निल चव्हाण दीपक डोळस ई,हिंदू - मुस्लिम भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**तहसिल कार्यालय पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर**

पत्ताः छत्रपती संभाजीनगर पैठण मार्ग, पैठण
जि. छत्रपती संभाजीनगर
दुरध्वनी क्र.: ०२४३१-२२३०५१ ई-मेल: tahsildarpathgmail.com
जे.क्र.: २०२५/डी.व्ही./जन्मतारीख/कवी

## जाहिर प्रगटन

**अर्जदारः** श्री. लक्ष्मण छगन जानकर, रा. पिंपळवाडी ता. पैठण, मो. ९४०४८५१८८२

**विषयः जन्म/मृत्यू सुधारणा कायदा २०२३ अर्ज.**

ज्यानुसार जाहिर प्रकटनाद्वारे श्री. लक्ष्मण छगन जानकर (रा. पिंपळवाडी ता. पैठण, मो. ९४०४८५१८८२) यांनी विनंती अर्ज सादर करून कळविले आहे की, यांचा **भाचा ( शिवांश )** यांचा जन्म पैठण येथील संदर्भ क्र. ०३ अन्वये रुग्णालयामध्ये दिनांक १८/०८/२०२५ रोजी झाला आहे.

त्याबाबतचे संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्याबाबतचे आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर/आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रकटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत उजर/आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह या न्यायालयात नोंदवावा.

मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर/आक्षेप/हरकत ग्राह्य धरले जाणार नाहीत व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर प्रकटन माझ्या सही व शिक्यानिशी देण्यात आले.

दिनांक: १३/०२/२०२६
**स्थळः** पैठण

**सही /-**
**तहसिलदार पैठण**

## उपविभागीय अधिकारी कार्यालय
## परतूर जि. जालना

संकेत स्थळ : www.jalna.nic.in
दूरध्वनी क्रमांक : ०२४८४-२२१००१
जा.क्र. २०२५/भूसंपादन/सीआर-

Email ID sdmparturgmail.com
फॅक्स क्रमांक : ०२४८४-२२१००१
दिनांक : १०/१२/२०२५

### दुरुस्ती पत्रक

ज्याअर्थी मौजे श्रीधरजवळगा ता. परतूर जि. जालना येथील जमीन निम्न दुधना प्रकल्पा करिता संपादित करणे बाबत कार्यकारी अभियंता जालना पाटबंधारे विभाग जालना यांनी भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी जालना यांचे कार्यालयामार्फत या कार्यालयात सादर केला होता. सदर प्रकरणात या कार्यालयाने नियमानुसार संपादित करावयाचे जमिनीची मोजणी करून घेऊन भूसंपादन कायदा २०१३ चे कलम ११ अन्वये अधिसूचना राजपत्रात, दोन स्थानिक वृत्तपत्रात व संबंधीत गावात प्रसिद्ध केली होती. सदरची अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात पान क्रमांक ०९ ते १० वर दिनांक ०२/०१/२०२५ रोजी प्रसिद्ध झालेली आहे. सदर प्रकरणात जमीन मालक यांनी आक्षेप अर्ज सादर केल्यामुळे संपादित जमिनीची फेर मोजणी करण्यात आली आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे दुरुस्ती वाचावी.

| करीता | | | वाचावे | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गट क्रमांक | संपादित करावयाचे क्षेत्र हे. आर | अ.क्र. | गट क्रमांक | संपादित करावयाचे क्षेत्र हे. आर |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | ४२ | ०.६ | १ | ४२<br>४२ | ०.०४<br>०.०२ |
| २ | ९६ | ०.११ | २ | ९६<br>९६ | ०.०७<br>०.०८ |
| ३ | ९७ | ०.०२ | ३ | ९७ | ०.०६ |
| ४ | ९७ | ०.०४ | ४ | ९७ | ०.०८ |
| ५ | ९८ | ०.०३ | ५ | ९८ | ०.०९ |
| ६ | ९८ | ०.०१ | ६ | ९८ | ०.०३ |
| ७ | ९९ | ०.०६ | ७ | ९९ | ०.१४ |
| ८ | २२२ | ०.५७ | ८ | २२२ | ०.५६ |

ठिकाण : परतूर
दिनांक : /२०२५

**(स्वाक्षरी)**
**उपविभागीय अधिकारी**
**परतूर जि. जालना**

जिमाका/जा/जाहि./८०/२०२५-२६

महाराष्ट्र शासन

## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

समता न्याय एकात्मता

**कार्यालयाचे नांव :- सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, जालना**
**पत्ता :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, जालना**

ई-मेल :- acswojalnagmail.com दूरध्वनी क्रमांक :- ०२४८२-२२५१७२

### निविदा सुचना

सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, जालना या कार्यालयाच्या अखत्यारीतील शासकीय निवासी शाळेत डिजीटल क्लास तयार करणे प्रकल्प राबविण्यासाठी नामांकित व अनुभवी संस्था यांच्याकडून शासनाच्या ई-निविदा प्रणालीवर निविदा पद्धतीने स्पर्धात्मक दर मागविण्यात येत आहे. खरेदी करावयाच्या वस्तू व निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र | निविदा सुचना क्र. | कामाचे तपशिल | अंदाजित किंमत रु. |
|---|---|---|---|
| ०१ | ०२/२०२५-२६ | समाज कल्याण विभागांतर्गत शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परिक्षा पुस्तके- लायब्ररी तयार करणे प्रकल्प. | रु.४५,००,०००/- |

१. निविदा विक्री दिनांक १३.०२.२०२६ सायंकाळी ५.०० पासुन सुरु होत असून, निविदा सादर करण्याच्या अंतीम दिनांक २६.०२.२०२६रोजी सायंकाळी ५.०० पर्यंत आहे. अधिक माहितीसाठी इच्छुक निविदाकार यांनी वेबसाईट https://mahatenders.gov.in () या संकेतस्थळावर संपर्क साधावा.

२. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, जालना यांनी निविदेतील बाबींची संख्या कमी/अधिक करण्याचे आणि कोणतेही कारण न देता निविदा नाकारण्याचे अधिकार स्वतःकडे राखून ठेवले आहेत.

३. ई-निविदा उघडण्याचा दिनांक ०२.०३.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता राहील.

४. ई-निविदा बाबतच्या मदतीसाठी / माहितीसाठी कृपया पुढील नमुद केलेल्या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. संपर्क क्र. ०२४८२-२२५१७२.

(टिप:- निविदा मागणी संदर्भात कोणतेही शुध्दीपत्रक / दुरुस्ती असल्यास ती संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल.)

दिनांक :- १३.०२.२०२६.
**ठिकाणः-** जालना.

**(स्वाक्षरी)**
**(राजु एडके)**
**सहाय्यक आयुक्त,**
**समाज कल्याण, जालना**

जिमाका/जा/जाहि./८४/२०२५-२६

# छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त जालना येथे भव्य सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी** /छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्यकर्तृत्व व शौर्यावर आधारित भव्य सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई तसेच जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांच्या संयुक्त विद्यमाने येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह, टाऊन हॉल, जालना येथे या कार्यक्रमाचे आायोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमांमधून छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्य, पराक्रम आणि लोककल्याणकारी कार्याचा गौरव करण्यात येणार आहे. या सांस्कृतिक सोहळ्याचे अध्यक्षस्थानी पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन तथा पालकमंत्री जालना जिल्हा पंकजा गोपीनाथ मुंडे उपस्थित राहणार आहेत. तर विशेष अतिथी म्हणून आमदार श्री. विक्रम काळे, श्री. राजेश राठोड, महापौर श्रीमती वंदना मगरे, खासदार श्री. कल्याण काळे आणि श्री. संजय जाधव, आमदार सर्वश्री सतीश चव्हाण, बबनराव लोणीकर, अर्जुनराव खोतकर, नारायण कुचे, संतोष पाटील दानवे, हिकमत उढाण उपस्थित राहणार आहेत. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नु पी.एम. आणि पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांची उपस्थिती लाभणार आहे.

या सांस्कृतिक कार्यक्रमात बुधवार, दिनांक १८ फेब्रुवारी, २०२६ रोजी सकाळी ११ वाजता प्रसिद्ध शाहीर अजिंक्य लिंगायत यांचा 'जागर शिवशाहीचा' हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम सादर होणार आहे. तसेच गुरुवार, दिनांक १९ फेब्रुवारी, २०२६ रोजी सकाळी ११ वाजता शाहीर रामानंद उगले, माधवी उगले-माळी, शाहीर अप्पासाहेब उगले आणि सहकलावंताचा समुह 'शाहिरी शिवदर्शन' हा कार्यक्रम सादर करणार आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज यांचे शौर्य, पराक्रम व त्यांच्या जीवनातील उदात्त मानवी मूल्यांची नवीन पिढीमध्ये रूजवणूक व्हावी या हेतूने या भव्य सांस्कृतिक सोहळा डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह, टाऊन हॉल, जुना जालना येथे संपन्न होणार असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी केले आहे.

# सुखापुरी येथील जिल्हा परिषद शाळेत सांस्कृतिक कार्यक्रमांचा जल्लोष; चिमुकल्यांच्या कलागुणांनी रसिक मंत्रमुग्ध

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी / गणेश सपकाळ** / जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेच्या वतीने आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन आणि सांस्कृतिक कार्यक्रम अत्यंत उत्साहात आणि दिमाखदार पद्धतीने संपन्न झाले.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्याने संपूर्ण गावकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले. कार्यक्रमाची सुरुवात अतिशय भक्तीमय वातावरणात 'गणेश वंदने'ने करण्यात आली.मंचावर साक्षात गणपती बाप्पाचे रूप साकारलेल्या विद्यार्थ्याच्या भोवती, पांढरा शुभ्र पोषाख आणि कमरेला लाल शेला बांधलेल्या चिमुकल्यांनी शिस्तबद्ध नृत्य सादर करत उपस्थितांची मने जिंकली.

या सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी केवळ पारंपारिक नृत्यच नव्हे, तर विविध सामाजिक संदेश देणारी नाटके, देशभक्तीपर गीते आणि महाराष्ट्राची संस्कृती दर्शवणारी लोकनृत्ये सादर केली. रंगीबेरंगी विद्युत रोषणाई आणि फुलांच्या सजावटीने सजलेल्या मंचावर लहान मुलांनी दाखवलेला आत्मविश्वास वाखाणण्याजोगा होता. प्रत्येक सादरीकरणानंतर उपस्थित पालक आणि ग्रामस्थांनी टाळ्यांच्या कडकडाटात विद्यार्थ्यांचे कौतुक केले. शाळेच्या मुख्याध्यापकांसह सर्व शिक्षक वृंद आणि शालेय व्यवस्थापन समितीने या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले होते.




कार्यक्रमाच्या शेवटी, विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध कलाविष्कारांचे कौतुक करताना मान्यवरांनी सांगितले की, अशा उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला मोठी चालना मिळते. सुखापुरी परिसरातील नागरिक, महिला आणि युवक मोठ्या संख्येने या सोहळ्याला उपस्थित होते. शाळेच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, चिमुकल्यांच्या या कलाविष्कारामुळे संपूर्ण सुखापुरी गाव सांस्कृतिक रंगात न्हाऊन निघाले होते.

# अभिनव जिगे याने जी मेन्स परीक्षेत मिळवले ९७ पर्सेंटाईल

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना जिल्हा प्रतिनिधी/ गणेश सपकाळ** / नॅशनल टेस्टिंग एजन्सीद्वारे घेण्यात आलेल्या जी मेन्स २०२६ परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून,यामध्ये मठपिंपळगाव (ता.अंबड)येथील अभिनव संतोष जिगे याने ९७ पर्सेंटाईल गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे.या गुणांसह तो आयआयटी प्रवेशासाठीच्या 'जी ड्व्हान्स्ड' परीक्षेसाठी पात्र ठरला आहे.

देशातील अत्यंत कठीण मानल्या जाणाऱ्या या परीक्षेत अभिनवने आपल्या जिद्द आणि परिश्रमाच्या जोरावर हे यश मिळवले असून या यशामुळे त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. ९७ पर्सेटाईल गुण मिळवल्यामुळे त्याला देशातील नामवंत एनआयटी किंवा आयआयआयटी सारख्या



संस्थांमध्ये अभियांत्रिकी प्रवेशाची संधी उपलब्ध झाली आहे.

अभिनवने आपल्या यशाचे श्रेय आई-वडील व शिक्षकांना दिले आहे. अत्यंत शिस्तबद्ध अभ्यास आणि सातत्य यामुळेच हे यश मिळाल्याचे त्याने सांगितले. आता 'जी ड्व्हान्स्ड' परीक्षेत यश मिळवून आयआयटीमध्ये प्रवेश मिळवणे हे त्याचे पुढील ध्येय आहे.

या यशाबद्दल अभिनवचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत असून,पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत..

# रायगव्हाणच्या जि.प. शाळेचा डंका!

## शालेय समितीची बिनविरोध निवड,२५ विद्यार्थी जाणार थेट अमेरिका दौऱ्यावर

**आत्ताच एक्सप्रेस**

**रायगव्हाण /प्रतिनिधी**/ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांनी जर जिद्द धरली, तर त्या जागतिक स्तरावर झेप घेऊ शकतात, याचा प्रत्यय रायगव्हाण (ता. शिरूर/पाथर्डी परिसरातील) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने दिला आहे.



नुकत्याच पार पडलेल्या बैठकीत शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीची निवड बिनविरोध करण्यात आली असून, याचवेळी शाळेच्या २५ विद्यार्थ्यांची अमेरिका अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाल्याची आनंदाची बातमी समोर आली आहे.

**नव्या जोमाने, नव्या समितीची निवड**

ग्रामस्थांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या बैठकीत सर्वानुमते खालील निवड करण्यात आली:

अध्यक्ष: अमोल हनुमंतराव आगळे,उपाध्यक्ष: संतोष बाबासाहेब पोटे,सदस्य: इतर १४ सदस्यांची देखील बिनविरोध निवड करण्यात आली आहे.मावळते अध्यक्ष प्रकाश सुदामराव कडपे आणि उपाध्यक्ष तुकाराम तुळशीराम पोटे यांनी आपल्या कार्यकाळात शाळेच्या विकासासाठी मोलाचे योगदान दिले. त्यांनी नूतन पदाधिकाऱ्यांचे हार घालून जंगी स्वागत केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

**रायगव्हाणचे विद्यार्थी गाजवणार अमेरिका!**

या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरली ती म्हणजे विद्यार्थ्यांच्या अमेरिका दौऱ्याची घोषणा. शाळेची शैक्षणिक प्रगती आणि गुणवत्ता पाहून येणाऱ्या काही महिन्यांत शाळेतील २५ विद्यार्थ्यांची अमेरिका येथील अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली आहे.

ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी थेट सातासमुद्रापार झेप घेणे, ही संपूर्ण जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

**शिक्षक आणि पालकांचा उत्साह**

शाळेची उंचावत चाललेली प्रगती पाहून शिक्षक वृंदांनी समाधान व्यक्त केले आहे. शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचा विश्वास यामुळेच आमचे विद्यार्थी आज जागतिक स्तरावर चमकत आहेत, अशा भावना नूतन अध्यक्ष अमोल आगळे यांनी व्यक्त केल्या. या यशाबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे आणि संपूर्ण शिक्षक चमूचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# पैठण शहरातील अतिक्रमण कारवाईबाबत नागरिकांमध्ये चर्चा


**आत्ताच णक्सप्रेस**

**पैठण प्रतिनिधी** / पैठण शहरामध्ये अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईसंदर्भात सध्या विविध चर्चांना उधाण आले आहे. शहरातील काही भागात गरिबांच्या झोपड्या पाडण्यात आल्याची घटना घडली असून, यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे. गरिबांवरच कारवाई का? धनाढ्य लोकांच्या बांधकामांवर कारवाई होणार का? असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

विशेषतः सोनार गल्ली परिसरातील (डी.पी. रोड) अतिक्रमणाबाबतही प्रशासनाने स्पष्ट भूमिका घ्यावी, अशी मागणी होत आहे. डी.पी. रोडवरील अतिक्रमण हटवून तो मार्ग पूर्णपणे मोकळा करण्यात येणार का, याबाबत नागरिकांमध्ये संभ्रम आहे.

नागरिकांचे म्हणणे आहे की अतिक्रमणमुक्तीची कारवाई ही सर्वांसाठी समान असावी. गरीब असो किंवा श्रीमंत - नियम सर्वांसाठी सारखेच लागू व्हावेत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

प्रशासनाने या प्रकरणात पारदर्शक भूमिका घेऊन सर्व अतिक्रमणांवर समान निकषांनुसार कारवाई करावी, तसेच नागरिकांमध्ये निर्माण झालेला संभ्रम




दूर करावा, अशी मागणी जोर धरत

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२११२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813